माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अन्वये
## प्राप्त झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक: १४४ /२०२३**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. हरिश सुधाकर रेहेकवार, रा. किल्ला वार्ड तिरोडा, ता. तिरोडा , जि. गोंदिया | लिपीक, नगर परिषद कार्यालय तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया | मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय तिरोडा, ता. तिरोडा जि. गोंदिया |

## सुनावणी दिनांक २९.०५.२०२५

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १४८६/२०२० मध्ये दिनांक ०५.०७.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक २९.०५.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, तिरोडा, जि. गोंदिया श्री. रोशन नामदेव बनकर उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी , नगर परिषद कार्यालय, तिरोडा अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १४८६/२०२० मध्ये दिनांक ०५.०७.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे.

" सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८.१२.२०१९ रोजी सादर केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.०१.२०२० रोजी मुद्दा क्र. १ ते ४ बाबतीतील उपलब्ध माहिती अपिलार्थीस अवगत केलेली आहे. त्यात मुद्दा क्र. १ व २ याबाबत शासकीय संकेतस्थळावर शोध घेवून माहिती उपलब्ध करून घ्यावी, असेही अपिलार्थीस सुचीत केले आहे. अपिलार्थी यांच्या जोडपत्र-अ चे अवलोकन केले असता, मागितलेली माहिती शासनाच्य विविध शासकीय संकेतस्थळावर उपलब्ध असून जनमाहिती अधिकारी यांच्या अखत्यारीत नाही. त्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ च नुसार दिसून येत नाही. कलम २ च नुसार माहिती याचा अर्थ कोणत्याही स्वरुपातील दस्ताऐवज अभिलेख, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, अहवाल नमुने, कागदपत्रे, कोणतीही ईलेक्ट्रॉनीक स्वरुपातील आधार सामग्री इत्यादीचा समावेश होतो. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार एखादया विषयावर सल्ला मागणे, एखादी कार्यवाही पूर्ण करुन माहिती देणे, एखादया कार्यवाही मागील खुलाशा अथवा कारण देणे, प्रश्नार्थक माहिती देणे, एखादया कार्यवाहीची अपेक्षा करणे इत्यादी बाबीचा या व्याख्येमध्ये समावेश

होत नाही. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.०१.२०२० रोजी दिलेल्या प्रतिसादात मुद्दा क्र. १ व २ च्या माहितीबाबत शासकीय संकेतस्थळाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे त्या संकेतस्थळावरून जनमाहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत माहिती संकलित करून अपिलार्थीस विनामूल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, या निर्देशासह प्रस्तुत व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे. ”

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अंतर्गत दिनांक.०३.०४.२०२३ रोजी (प्राप्त दिनांक ०८.०५.२०२३) आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, “ आपल्या आदेशाचे पालन न करणाऱ्या दोषी जनमाहिती अधिकारी /मा. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद, तिरोडा यांच्यावर कलम २० (१) प्रमाणे प्रत्येक दिवसाला रु. २५०/- प्रमाणे शास्ती लावण्याची विनंती करण्यात येते. ” अशी आयोगास विनंती केली आहे.

**युक्तीवाद/खुलासा** :-आज सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता, श्री. रेहेकवार उपस्थित असून त्यांनी आयोगास, सांगितले की, त्यांना मिळालेली माहिती दिशाभूल करणारी आहे. आयोगाने व्दितीय अपील क्र. १४८६/२०२० मध्ये दिनांक ०५.०७.२०२२ रोजी अपिलार्थी यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.०१.२०२० रोजी दिलेल्या प्रतिसादात मुद्दा क्र. १ व २ च्या माहितीबाबत शासकीय संकेतस्थळाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे त्या संकेतस्थळावरून जनमाहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत माहिती संकलित करून अपिलार्थीस विनामूल्य प्रदान करण्यात यावी व त्याची पोहच आयोगास सादर करावी, असे आदेशित केले. परंतु अद्यापही तक्रारकर्ता यांना जोडपत्र-अ नुसार सदर माहिती संकेतस्थळावरून काढून देण्यात आली नाही. याबाबत उपस्थित विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, तिरोडा यांना विचारणा करण्यात आली असता, त्यांना सदर प्रकरणी काहीही सांगता आले नाही. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी सदर सुनावणीस अनुपस्थित आहेत.

**निष्कर्ष** :सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, तिरोडा यांनी व्दितीय अपील क्र. १४८६/२०२० मध्ये दिनांक ०५.०७.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशाची अमंलबजावणी करणे आवश्यक आहे. व सदर माहिती साक्षांकित/प्रमाणित करून माहिती अधिकार अधिनियमाच्या शिक्क्यासह स्वाक्षरी करून देणे अपेक्षित आहे.

२.प्राधिकरणाच्या अनुपस्थितीबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा. मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार आयोगाची सुनावणी नोटीस प्राप्त झाल्यानंतर संबंधित तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी त्याचप्रमाणे इतर संबंधित अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता व्दितीय अपीलाच्या सुनावणीस गैरहजर राहील्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल,” असे नमूद केले आहे. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी ,

नगर परिषद कार्यालय, तिरोडा हे आयोगास कोणतीही पूर्वसुचना न देता सुनावणीस अनुपस्थित असल्यामुळे त्यांना याबाबत अनुपस्थितीचा खुलासा मागविणे व सक्त ताकीद देणे आवश्यक आहे.

३.तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, तिरोडा यांनी सदर सुनावणीची कोणतीही पूर्व तयारी न केल्यामुळे त्यांना या प्रकरणानुषंगाने आयोगासमक्ष काहीही सांगता आले नाही. सबब, सदर प्रकरणी त्यांनाही सक्त ताकीद देणे आवश्यक आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, तिरोडा, जि. गोंदिया यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत व्दितीय अपील क्र. १४८६/२०२० मध्ये दिनांक ०५.०७.२०२२ रोजीच्या आदेशाची अमंलबजावणी करून आयोगास अहवाल सादर करावा. तसेच तक्रारकर्ता यांना सदर माहिती साक्षांकित/प्रमाणित करून माहिती अधिकार अधिनियमाच्या शिक्क्यासह स्वाक्षरी करून देणे अपेक्षित आहे.

२. विद्यमान जनमाहिती अधिकारी व कनिष्ठ लिपीक, नगर परिषद कार्यालय, तिरोडा जि. गोंदिया, श्री. रोशन नामदेव बनकर यांनी यापुढे सुनावणीसाठी आयोगात येताना प्रकरणाची पूर्वतयारी करून यावे.

३. आज रोजी सुनावणी दरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे आयोगाच्या पूर्व परवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी आयोगाचा बहुमूल्य वेळ वाया घालविला आहे. या प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी , नगर परिषद कार्यालय, तिरोडा, जि. गोंदिया श्री. अमोल माळकर यांना सक्त ताकीद देण्यात येते की, या पुढील काळात आयोगासमोरील सुनावणीस कोणतीही पूर्व सूचना न देता किंवा कोणतीही लेखी सूचना न देता अनुपस्थित राहिल्यास आपणाविरुध्द महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण२०१५/प्र.क्र.(२२२/१५) सहा.मंत्रालय मुंबई, दिनांक ०१.१२.२०१५ नुसार कार्यवाही करण्यात येईल, याची दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त आदेशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

Gnimdeo

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : २९.०५.२०२५

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर * नागपूर *

जा.क्र. 2842 दि. 10 JUN 2025

SD E:\तक्रार क्र. 144-2023 - रेहेवार